दै गोदातीर दि. 17/09/2022

दै गोदातीर दि-17/09/2022

# दुचाकी चोराची टोळी जेरबंद; पाच दुचाकी जप्त; स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

**नांदेड–** शहर व परिसरात दुचाकी चोरांनी हैदोस घालत दुचाकी चालकांची नजर चुकवत अनेक भागांतून दुचाकी पळविण्याच्या घटना वाढल्या आहेत. या घटनांवर प्रतिबंध घालण्याच्या सूचना पोलीस अधीक्षक प्रमोदकुमार शेवाळे, अतिरिक्त पोलीस अधीक्षक निलेश मोरे यांनी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक द्वारकादास चिखलीकर यांना दिल्या. स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने बिलोली तालुक्यात कारवाई करून दोन आरोपींना अटक केली. त्यांच्याकडून पाच दुचाकी जप्त केल्या आहेत. या दोन्ही आरोपींना बिलोली पोलिसांच्या स्वाधीन केले आहे. ही कारवाई सोळा सप्टेंबर रोजी करण्यात आली.

नांदेड शहर व जिल्ह्यात दुचाकी चोरांनी आपले डोके वर काढले असून मागील काही अनेक दिवसांपासून दुचाकी चोरीच्या घटना घडत आहेत. यामुळे वाहनधारकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले होते. या चोरट्यांच्या मुसक्या आवळण्याच्या सूचना पोलीस अधीक्षक यांनी स्थानिक गुन्हे शाखेला दिल्यानंतर स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक द्वारकादात चिखलीकर यांनी आपल्या सहकारी अधिकाऱ्यांना आदेश दिले. यावेळी सहाय्यक पोलीस निरीक्षक पांडुरंग माने आणि फौजदार जसवंत सिंग शाहू यांचे पथक बिलोली तालुक्यात गस्तीवर होते. त्यांना मिळालेल्या माहितीवरून बिलोली तालुक्यातील लोहगाव येथील सिद्धार्थनगरमध्ये राहणारा प्रभाकर मोहनराव वानोळे यांच्या घरी चोरीच्या दुचाकी असल्याची माहिती मिळाली. पोलिसांनी सापळा रचून त्याच्या घरी कारवाई केली असता पाच दुचाकी कासराळी, नरसी, वझरगा, करखेरी शिवारातून चोरून विक्री करण्याच्या उद्देशाने जमा करून ठेवल्या होत्या. पोलिसांनी त्याचा सहकारी शिवशंकर भोजराम शेळके वय २४ राहणार करखेली तालुका धर्माबाद यालाही अटक केली आहे. या दोघांनी दुचाकी चोरी केल्याची कबुली पोलिसांना दिली आहे. जवळपास एक लाख ७७ हजार रुपयांच्या पाच दुचाकी आणि दोन्ही चोरटे पोलीस बिलोली पोलिसांच्या स्वाधीन केले आहेत. त्यांच्याकडून अन्य दुचाकी चोरीचे गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक द्वारकादास चिखलीकर यांनी व्यक्त केली आहे.